| MHJN020005472013 | नियमित दिवाणी दावा क्र.२२१/२०१३<br>निलावती व इतर वि. शासन व इतर<br>CNRMHJN020005472013 |
| --- | --- |

## निशाणी क्र.८४ वरील आदेश

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे प्रस्तुतचा दावा व नियमित दिवाणी दावा क्र.४३३/२०१३ हौशल्याबाई विरुध्द निलावती हे दोन्ही दावे एकत्रित पुरावा नोंदवून एकत्रित न्यायनिर्णय देणेबाबत प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

२) वादींने कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा हा वादी कायदेशीर मालक व ताबेदार आहेत असे घोषित करुन मिळण्यासाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केला असून प्रस्तुतच्या प्रकरणातील प्रतिवादी क्र.६ हिने प्रस्तुतचा दावा दाखल केल्यानंतर नियमित दिवाणी दावा क्र.४३३/२०१३ हा दावा मौजे बाजीउम्रद ता. जि. जालना येथील गट क्र.३०३, १६०, २४४, २२०, ३२०, १५८ व २९१ या मिळकतीमध्ये वाटणी होवून ताबा व मनाई हुकूम मिळण्याबाबत दावा दाखल केला आहे. दोन्ही दाव्यातील मिळकती देखील एकच आहे व चौकशीचे मुद्दे देखिल सारखेच असून दोन्ही दाव्यात कागदोपत्री पुरावा देखिल एकच असल्याने दोन्ही दाव्यातील पुरावा एकत्रित करुन एकत्र न्यायनिर्णय देण्यात यावा अशी विनंती केली.

३) प्रतिवादी क्र.१ ते ७ तर्फे सदर अर्जावर म्हणणे देण्यात आले नाही. प्रतिवादी क्र.६ व ८ तर्फे म्हणणे देण्यात आले की, सदर दोन्ही प्रकरणे एकाच दिवशी

सुनावणीस ठेवण्यास हरकत नसल्याचे कळविले.

४) दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली असता, प्रस्तुतचा दाव्यामधील प्रतिवादी क्र.६ हिने प्रस्तुतच्या प्रकरणातील वादी क्र.१ ते ५ व इतर यांच्याविरुध्द नियमित दिवाणी दावा क्र.४३३/२०१३ हा दिनांक २४/०९/२०१३ रोजी दाखल केला असून सदर दाव्यामध्ये मौजे बाजीउम्रद येथील गट क्र.३०३, १६०, २४४, २२०, ३२०, १५८ व २९१ संदर्भात वाटणी व मनाई हुकूमसाठी दावा दाखल केला असल्याचे आढळते. दोन्ही दाव्यांतील मिळकती हया बहूतांशी एकच आहे. परंतु, सदर नियमित दिवाणी दावा क्र.४३३/२०१३ मध्ये वादींतर्फे साक्षीपुरावा नोंदविण्यात येवून पुरावा बंद पुरशिस देण्यात आली असून प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रकरण प्रलंबित आहे. सदर दोन्ही दावे याच न्यायालयात प्रलंबित असून एकाच दिवशी ते सुनावणीसाठी ठेवण्यात येत असल्याचे रोजनाम्यावरुन स्पष्टपणे दिसून येते. प्रस्तुतच्या प्रकरणात वादींचा पुरावा नोंदविणे बाकी असून दुसऱ्या प्रकारणात वादींचा पुरावा नोंदविणे पूर्ण झाले आहे. अशा परिस्थितीत आजमितीला दोन्ही प्रकरणामध्ये एकत्रित पुरावा नोंदविण्याचा आदेश दिल्यास गुंतागुंत निर्माण होवू शकते. परंतु, दोन्ही प्रकरणांमधील वाद मिळकती व मुद्दे समान असल्याने व पक्षकार एकच असल्याने एकत्रित पुरावा न नोंदविता दोन्ही प्रकरणे एकाच दिवशी ठेवून चालविणे उचीत ठरेल. त्यामुळे प्रकरणातील एकंदरीत परिस्थिती पाहता, त्यामध्ये एकत्रित साक्षीपुरावा नोंदवून एकत्र निकाली काढणे बाबत वादींची मागणी स्वीकार्य नसल्याचे आढळते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१) अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) प्रस्तुतचा दावा व नियमित दिवाणी दावा क्र.४३३/२०१३ हे दोन्ही दावे एकाच दिवशी संपरिक्षेसाठी (Trial) ठेवण्यात यावे, असा आदेश पारीत करण्यात येतो.

३) अर्जाचा खर्चाचा विचार अंतिम न्यायनिर्णयाचे वेळी करण्यात येईल.

Digitally signed by KULKARNI MADHURI SUDHAKAR
Date: 2022.01.14 16:52:57 +0530

(**माधुरी एस. कुलकर्णी**)

दिनांकः १२/०१/२०२२

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
जालना

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : १४/०१/२०२२

सही/-
एम. डी. आढे
लघुलेखक (नि. श्रे.)